# कर्मवीर शंकरराव काळे सह.साखर कारखाना लि.गौतमनगर
## पो.कोळपेवाडी ता.कोपरगाव जि. अहमदनगर

**जा.क्र./ऊस विकास/ ३४६८** **दि.२०/०२/२०२४**

## परिपत्रक
### -विशेष प्रोत्साहनपर अनुदान-

आपले कारखान्याचे कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व 'क' वर्ग सभासदांना कळविण्यात येते की,माहे मार्च २०२४ ते एप्रिल २०२४ या दरम्यान गाळपास येणाऱ्या ऊसास खालीलप्रमाणे विशेष प्रोत्साहनपर अनुदान देणेचा निर्णय कारखान्याचे मा. संचालक मंडळाने घेतलेला आहे. तो खालील प्रमाणे आहे.

| महिना | ऊस पुरवठा कालावधी | अनुदान रक्कम रु.(प्र.मे.टन) |
|---|---|---|
| मार्च | दि.१/३/२०२४ ते ३१/०३/२०२४ | ५०/- |
| एप्रिल | दि.१/४/२०२४ पासुन गाळप हंगाम संपेपर्यंत | ७५/- |

### लागवड हंगाम -२०२३-२४ (गळीत हंगाम २०२४-२५) करीता
### - ठिबक धोरण राबविणेबाबत -

आपले कारखान्याचे कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व 'क' वर्ग सभासदांना कळविण्यात येते की, चालु वर्षी कमी पर्जन्यमान व विहीरींची खालवलेली पाणी पातळी या बाबी विचारात घेवुन दुष्काळी परिस्थितीमध्ये ऊस पिकांची जोपासणी करणे कामी मा.संचालक मंडळाने खालील प्रमाणे ठिबक धोरण राबविण्याचे ठरविलेले आहे.

**अ) आयएसआय / नॉन आयएसआय ठिबक जलसिंचन संच -**

| अ.न | योजनेचा तपशिल | योजनेचे स्वरुप व रक्कम |
|---|---|---|
| १ | कारखाना सहभाग (संच खरेदी कामी ॲडव्हान्स) संच कार्यान्वीत झाल्यानंतर प्रत्यक्ष पाहणी अहवाल व संच खरेदी बिल प्राप्त झालेनंतर लाभार्थीच्या नावे टाकुन आदा करण्यात येईल. | प्रती एकरी रु.१००००/-ॲडव्हॉन्स |
| २ | आवश्यक कागदपत्र | ठिबक संच मागणी अर्ज,पेंमेट कपातीचे संमती पत्र, ७/१२ ,८अ उतारा कारखाना करारनामासाठी रु.१००/- चा एक स्टॅम्प,ठिबक संच खरेदीचे मुळ बिल,आधारकार्ड |

**ब) ठिबक सिंचनाकरीता अनुदान-:**

जे सभासद शेतकरी कारखान्यामार्फत व खाजगी स्वमालकीचे त्यांचेजवळ असलेले जुने अथवा नवे ठिबक संच ऊस पिकासाठी बसवतील त्याची प्रत्यक्ष पाहणी करून ठिबक सिंचनावरील उत्पादीत ऊस गळीतास आलेनंतर **प्रती मे.टन रू १००/-** प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येईल.**कारखान्याचे शेतकी विभागामार्फत ठिबक संचाची पाहणी करण्यात येईल .**

**योजनेच्या शर्ती व अटी-**

१. कारखान्याकडे ऊस नोंद असणे आवश्यक आहे. तसेच कारखाना थकबाकी नसावी.
२. संच खरेदी करीता अपेक्षित खर्चापेक्षा जास्तीचा येणारा खर्च शेतकऱ्यांने परस्पर करावयाचा आहे.
३. कारखाना ॲडव्हान्स रक्कम लाभ धारकाचे ऊस बिलातून अग्रहक्काने सव्याज (१२.५%) वसूल केली जाईल.
४. ऊस पिकातील ठिबक संच शेतामध्ये कार्यान्वीत असने आवश्यक आहे. तरच ऊस उत्पादक शेतकऱ्याला अनुदान देयता राहील.
५. ठिबक संच बसविल्यानंतर त्यांची नोंद शेतकी विभागाकडे करणे आवश्यक आहे.

वरील ठिबक सिंचन योजनेच्या नियम व अटी या प्राथमिक स्वरूपाच्या असून त्यात बदल करणेचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.योजनेत सहभागी ठिबक कंपन्या व योजनेच्या अधिक माहितीसाठी कारखान्याचे ऊस विकास कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त ऊस लागवड ठिबक सिंचनाखाली घेण्यात यावी ही विनंती.

**कळावे,**

**आपला विश्वासु**

**एस.एस.कोल्हे**

**प्र.कार्यकारी संचालक**